# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

दिनांक १३.१०.२०२६ मंगळवार

(कामगिरी)

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १२.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून एकुण ४,४०५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून एकुण ५२,१५०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका २३ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये १०६ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ८४ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २४० केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १३३ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ४९ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १० केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १४७ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका १२ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १४ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०९ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ८१८ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ३१ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ३२ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,७८८ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ८,३९,१००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक, ०६ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०२.१०.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक ०३.१०.२०२६ चे १५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत ५६०, गोंड मोहल्ला, यशोधरानगर, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. यशोदा विश्वनाथ कुंभारे, वय ५६ वर्षे हया आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मुलीकडे गोधनी, नागपूर येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य लाकडी दरवाज्याचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख २,००,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ४,८७,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात, यशोधरानगर पोलीसांनी व तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपीस निष्पन्न करून, आरोपी नामे १) प्रविण अनिल वालदे, वय २२ वर्षे, रा. संजय गांधी नगर, राणी दुर्गावती चौक, यशोधरानगर, नागपुर यास ताब्यात घेतले. त्यास वर नमुद गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने त्याचे साथीदार नामे २) साहील पवन मेश्राम, वय २० वर्षे, रा. संजय गांधीनगर, सिध्दार्थ गौतम बुध्द विहारजवळ, यशोधरानगर, नागपुर ३) आर्यन धरमपाल भांगे, वय १९ वर्षे, रा. सुगत नगर बुध्द विहार जवळ, राजनगर, जरीपटका, नागपुर यांचेसह संगणमताने घरफोडी केल्याची कबुली दिली. आरोपींची सखोल विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत एक घरफोडीची गुन्हा व पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीतुन अॅक्टीवा ४ जी क्र. एम.एच. ३६ एफ.डी ३५९४, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत होंडा अॅक्टीवा क्र. एम.एच ४९ डि.बी १९७२, पोलीस ठाणे कळमना हद्दीतुन यामाहा एफझेड क्र. एम. एच ४९ बि.डी ७२१४ आणि हिरोहोंडा स्प्लेंडर क्र. एम.एच ३१ बि.व्ही २७१६ असे ०४ वाहनचोरीचे व दोन घरफोडीचे असे एकुण ०६ गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन रोख २,००,०००/—रू., वेगवेगळे सोन्या—चांदीचे दागिने व ०४ चोरी केलेले वाहने असा एकुण किंमती ५,१२,२००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुसचॉद शेख, दुपोनि. विवेकानंद भारती, पोउपनि. अनंत पाटील, पोहवा. राहुल बोंदरे, अशोक तायडे, पोअं. मनिष झरकर, संदीप वानखेडे, शितेष चौरसिया, भुषण येरोजवार, प्रविण बावणकर व प्रविण ईनवाते यांनी केली.




**<u>३) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक १३.१०.२०२६ चे ०४.३० वा. ते ०६.१० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत ताजनगर टेका, इस्रार

अन्सारी चे घरासमोर सार्वजनिक रोडवर सुझुकी मोपेड गाडीजवळ उभे असलेले इसमांवर संशय आल्याने त्यांना ताब्यात घेऊन, त्यांचे नाव पत्ते विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) सलमान अब्दुल रहमान अंसारी, वय ३१ वर्षे, रा. प्लॉट क्र. ४४९, बिलाल मस्जिदजवळ, यशोधरानगर चौक, नागपूर २) संदीप उर्फ भुऱ्या गणेश लिल्लारे, वय २२ वर्षे, रा. आराधना नगर, हनुमान मंदीरजवळ, बिडगाव, भांडेवाडी, नागपूर ३) अतीकुर रेहमान मोबीन रेहमान अन्सारी, वय २९ वर्षे, रा. प्लॉट नं. १४४९, योगी अरविंद नगर, यशोधरानगर, नागपुर असे सांगितले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, त्यांची एनडीपीएस कायद्यातील तरतुदींचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष त्यांची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यात अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा एकुण वजनी १ किलो २०० ग्रॅम किमती १,००,०००/—रू. चा मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन गांजा, दोन मोबाईल फोन व सुझुकी ॲक्सेस मोपेड असा एकुण २,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे पाचपावली येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पाचपावली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षीरसागर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>४) गुन्हेशाखा पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १२.१०.२०२६ चे १६.२५ वा. ते २०.५५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग व अनैतिक व्यापार प्रतिबंधक पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे राणाप्रताप नगर हद्दीत, प्लॉट नं. २००, कांता पॅलेस, कोतवाल नगर येथील ‘अव्हीरा पंचकर्म ॲण्ड स्पा सेंटर’ येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे ईसम नामे १) योगेश अशोकराव इंगोले, वय ३५ वर्षे, रा. गीता नगर, मानेवाडा, बेसा, नागपुर व महीला नामे २) सुप्रीया राजु रायकवार, वय ३५ वर्षे, रा. भुपेश नगर, बोरगांव, नागपुर हे दोघे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना व पिडीत महीलांना देहव्यापाराकरीता जागा उपलब्ध करवून, देहव्यवसाय करवुन घेताना समक्ष मिळुन आले.

आरोपींचे ताब्यातुन ०३ पिडीत महीलेची सुटका करण्यात आली. आरोपीचे ताब्यातुन रोख २,५००/—रू., ०२ मोबाईल फोन व इतर साहित्य असा एकुण किंमती १७,६९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे राणाप्रताप नगर येथे कलम १४३(२)(३) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपी व पिडीत महिलेस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव राणाप्रताप नगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि. शिवाजी नन्नावरे, पोहवा. लक्ष्मण चौरे, किशोर ठाकरे, नितीन वासने, प्रकाश माथनकर, मपोहवा. लता गवई, पुनम शेंडे व मपोअं. अश्वीनी खोडपेवार यांनी केली.



**५) गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.**

दिनांक १३.१०.२०२६ चे ०२.३० वा. ते ३.४० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथक हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत स्वीपर कॉलोनी, यादव नगर येथे एक इसम संशयीतरित्या दिसुन आल्याने, त्यास हटकेल असता तो पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सन्नी जयरामदास मखीजा, वय ३२ वर्षे, रा. प्लॉट नं. ३६, देवी नगर, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत एक धारदार लोखंडी चाकु किमती ५००/—रू. चा मिळून आला. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२६ नुसार आदेश दिनांक ०७.०७.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रासह समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम १४२, १३५ म.पो.का., सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीचे ताब्यातुन चाकु किंमती ५००/—रू. चा जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मसपोनि. मंगला हरडे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.




**<u>६) गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.</u>**

दिनांक १२.१०.२०२६ चे १२.२० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत नागपुर—जबलपुर हायवे, जिओ पेट्रोलपंप जवळील कबाडीचे दुकानात एक हद्दपार इसम आला आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम दिसल्याने त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विजय शामराव चन्ने, वय ५० वर्षे, रा. प्लॉट नं. ३८, गोपालकृष्ण लॉन मागे, शारदा नगर, वाठोडा, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती व तो बसलेल्या पलंगाची झडती घेतली असता, पलंगावरील ब्लॅकेटखाली एक धारदार लोखंडी मोठा चाकु किमती ५००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०४ यांचे हद्दपार आदेश क्र. ४८/२०२६ नुसार आदेश दिनांक ३१.१२.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रासह समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाठोडा येथे आरोपीविरूध्द कलम १४२, १३५ म.पो. का., सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. संजीवनी थोरात, पोउपनि. जितेशाचारी आरवेल्ली, सफौ. शेख नजीर, पोहवा. भगवती ठाकुर, अभिषेक शनिवारे, देवेंद्र नवघरे, पोअं. गोविंद देशमुख व महेश काटवले यांनी केली.



**(मिसींग)**

**<u>पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :—** फिर्यादी देविदास कोठीराम ढोले, वय ६२ वर्षे, रा. प्लॉट नं. ७३, मंगलदिप नगर २, आराधना नगर, बेसा रोड, हुडकेश्वर, नागपूर यांनी पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे तक्रार दिली की, त्यांचे भाऊ नामे मनिराम कोठीराम ढोले, वय ५१ वर्षे हे दिनांक ०६.१०.२०२६ चे ०८.३० वा. पासुन राहते घरून बेपत्ता झाले आहेत. शोध घेतला असता, मिळून आले नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द **कलम १४०(३) भान्यासं.** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ११ इंच, केस—काळे पांढरे, अंगात— गुलाबी रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी, हिंदी बोलतात.



मनिराम

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. जिल्हा व अती. सत्र न्यायाधीश, विशेष न्यायालय (मकोका | ५७३/२०२६ | कलम १०९(१), १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, | **१)** सोहेल उर्फ अन्नु उर्फ माया प्यारे शेख, वय २४ वर्षे, रा. जुना कामठी रोड, | ३०.१०.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कोर्ट) न्यायमंदीर, नागपुर. | | ११८(१), ११८(२), ११५(२), २९६, ३५१(२), ३(५) भा.दं.वि., सहकलम ३(१)(ii),३(२), ३(४) महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा— १९९९ (मकोका) | कळमना, नागपुर. **२)** आदीत्य उर्फ काला नत्थुलाल झारीया, वय २४ वर्षे, रा. ह.मु.— जुना कामठी रोड, कळमना, नागपुर. मुळ पत्ता— डोंगरगांव, वर्धा रोड, जि. नागपुर. **३)** गौरव सुरेशचंद्र साहु, वय २२ वर्षे, रा. लाभ लक्ष्मी नगर, दत्तमंदीर मागे, कळमना, अन्नाचे भट्टीमागे, कळमना, नागपुर. **४)** राहुल बंडु बागडे, वय २१ वर्षे, रा. प्लॉट नं. ११८, लाभ लक्ष्मी नगर, दत्तमंदीर मागे, कळमना, अन्नाचे भट्टीमागे, कळमना, नागपुर. | |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**